दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## सॅनिटरी नॅपकिन्सच्या पाकिटावर राहुल गांधींचा फोटो; बिहारमध्ये प्रचंड वाद

पाटणा दि.४ (वृत्तसंस्था)- बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. रॅली, सभा, मेळाव्यांसह नेते पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेत निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाच्या कामाचा आढावा घेत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत आहेत. तसेच विविध राजकीय पक्षांकडून निवडणुकीसाठी रणनीती आखत विविध उपक्रम राबवले जात आहेत. काँग्रेसनेही बिहार निवडणुकीसाठी आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

विधानसभेच्या निवडणुकीत महिला मतदारांना आकर्षित करण्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने काही उपक्रम हाती घेतले आहेत. मात्र, ऐन निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसच्या एका उपक्रमावरून बिहारच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटलं आहे. काँग्रेसने सॅनिटरी नॅपकिन्स वाटण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. मात्र, त्या सॅनिटरी नॅपकिन्सच्या पाकिटावर काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा फोटो देण्यात आल्यामुळे प्रचंड वाद सुरू झाला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.


(वर्ष ६४ वे अंक १७१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.०५ जुलै २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# महाराष्ट्रात वाढत्या शेतकरी आत्महत्या भूषणावह नाहीत-नाना पटोले

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- 'राज्यात शेतकऱ्यांच्या, तरुणाईच्या, बेरोजगारांच्या, कामगारांच्या आत्महत्या होत आहेत. निरपराध नागरिकांवर कारवाई करण्यात येत आहे. शेतकऱ्यांची व्यथा भयावह आहे. आज बळीराजाची आभाळ फाटल्यासारखी परिस्थिती आहे. राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत चिंता व्यक्त केली. त्यावर भाजपचे नेते कर्नाटक आणि बाकीच्या राज्यात बघा, महाराष्ट्र चांगला आहे, असे उत्तर देतात. ज्या महाराष्ट्राने देशाला दिशा देण्याचे काम केले, त्या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत असतील, तर हे राज्याला भूषणावह नाही. ही सर्व परिस्थिती बिघडवण्याचे काम सरकारने केले आहे,' असा हल्लाबोल काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला.



विधानसभेत बोलताना ते म्हणाले, 'गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात खरीप हंगामाचे पैसे अद्याप शेतकऱ्यांना दिलेले नाहीत. डीबीटीच्या माध्यमातून आम्ही शेतकऱ्यांना पैसे दिले, असा गवगवा करण्यात आला. शेतकऱ्यांनी पिकवलेले धान्य समर्थन मूल्याने खरेदी केले गेले पाहिजे, यासाठी केंद्र सरकारने योजना आणली; आणि ते धान्य घेतल्यानंतर ते पैसे देणे भाग आहे. पण एक वर्षापासून सरकारने शेतकऱ्यांना पैसे दिलेले नाहीत. शेतकऱ्याने शेती कशी करावी, हा प्रश्न आहे. लातूर जिल्ह्यातील एक शेतकरी स्वतःला औताला जुंपून घेतो आणि शेतकरी भगिनी त्याला हाकते आहे, असे चित्र संपूर्ण जगात प्रसिद्ध झाले. लातूर जिल्ह्यातील ही घटना छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राला शोभणीय नाही. राज्यातील शेतकऱ्याने स्वतःला जुंपून घ्यावे, आणि मग नंतर सरकारने त्या शेतकऱ्याचे कर्ज माफ करावे, त्याला बैलजोडी देऊन मदत करावी, त्यासाठी वाट बघावी का?'

'सरकारने गोरक्षणाचा कायदा केला. गोंदिया जिल्ह्यात शेतकरी उन्हाळ्यात शेतीसाठी बैल घेऊन जात असताना पोलिसांनी त्यांना पकडले. त्यांचे बैल जप्त केले आणि तथाकथित गोरक्षकांच्या स्वाधीन करून त्यांच्या संस्थेत पाठवले. मी कलेक्टरला फोन केला असता, त्यांनी ठाणेदाराला सांगून सोडविण्यासाठी सांगितले; परंतु या तथाकथित गोरक्षकांनी ते बैल देण्यास नकार दिला. त्यांनी ते परस्पर विकून टाकले. हे तथाकथित गोरक्षक शेतकऱ्यांना लुटत आहेत. यावर सरकारने उपाययोजना करणे गरजेचे आहे. काल घडलेली घटना राज्याला भूषणावह नाही. शेतकऱ्यांची चेष्टा सरकारने लावली आहे,' असा आरोपही पटोले यांनी केला.

## 'जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात' घोषनेनंतर उपमुख्यमंत्री शिंदेंनी दिले स्पष्टीकरण



पुणे दि.७ (प्रतिनिधी)- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत पुण्यात पार पडलेल्या जयराज स्पोर्ट्स अँड कन्व्हेन्शन सेंटरच्या उद्घाटन समारंभात भाषणादरम्यान, एकनाथ शिंदे यांनी 'जय हिंद, जय महाराष्ट्र,जय गुजरात' असा नारा दिला. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आणि आश्चर्याची भावना व्यक्त केली. या मुद्द्यावरून विरोधकांनी टीकेची झोड उठवली. यावर आता शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

'पुण्यात पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या गुजराती बांधवांनी एक स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारले आहे. त्यात सर्वसामान्य लोकांना विविध सोयी आणि सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याचे आज लोकार्पण झाले. मी नेहमी जय हिंद जय महाराष्ट्र तर म्हणतच असतो, जय हिंद हा देशाचा अभिमान तर जय महाराष्ट्र हा राज्याचा अभिमान. त्यासोबत मी शेवटी जय गुजरात म्हणालो, कारण समोरची सगळी लोकं गुजराती समाजाची होती आणि त्यांनी वर्षानुवर्षे आणि पिढ्यानपिढ्या या महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानली. तिथे जो प्रकल्प उभा राहिला आहे, तो सर्व लोकांसाठी आहे. त्यामुळे त्यांची प्रशंसा करण्यासाठी आणि अभिनंदन करण्यासाठी मी तसे म्हणालो,' असे स्पष्टीकरण एकनाथ शिंदे यांनी दिले.

'माझ्या या वक्तव्यानंतर जे लोक टीका करण्याचे काम करत आहे, त्या लोकांबद्दल मी जास्त काही भाष्य करू इच्छित नाही. पण मी एवढेच सांगेन की जिनके घर शिशे के होते है, वो दुसरो के घर पे पत्थर नही मारा करते...' असा सणसणीत टोला शिंदे यांनी ठाकरे गटाला लगावला. त्यानंतर शिंदे यांनी उद्धव ठाकरेंचा जय गुजरात अशी घोषणा देतानाचा व्हिडीओ दाखवला. तसेच, उबाठाच्या अधिकृत पेजवरील गुजराथी भाषेतले पत्र दाखवले. त्याचसोबत आदित्य ठाकरे यांचे 'केम छो वरळी' हे पोस्टरही दाखवले.

## संजय शिरसाट यांनी निधीवरुन वाद घालण्याचा प्रकार केला म्हणून प्रकरणे बाहेर आली-जितेंद्र आव्हाड



मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- संजय शिरसाट यांनी निधीवरुन वाद घालण्याचा प्रकार केला आणि त्यांची इतकी प्रकरणं बाहेर आली की बोलणंच बंद केलं असा गंभीर आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. सामाजिक न्याय, आदिवासी आणि ओबीसींचा निधीच पहिले जातो, यांच्याबद्दल यांना प्रेमच नाही आहे. मात्र हे संविधानिक प्रावधान आहे. असे असताना शिरसाट सारख्या ल [illegible] शिवसैनिकांची शेळी करुन टाकली अशी टीकाही जितेंद्र आव्हाड यांनी सामाजिक न्याय मंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांच्यावर केली आहे.

महाराष्ट्राचा आर्थिक गाडाच विस्कळीत झाला आहे. १ लाख २ हजार कोटी आणणार तरी कुठून? पुढील ५ वर्षात १०-१२ कंत्राटदार आत्महत्या करतील. सध्या आर्थिक परिस्थिती (पान ४ वर)

# देशातील आरोग्याचे बजेटमध्ये वाढ करण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले-अमित शाह

पुणे दि.४ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने आरोग्य क्षेत्रात चांगले काम केले आहे. देशाचे आरोग्याचे बजेट ३७ हजार कोटी रुपये होते. हे बजेट आता १ लाख ३६ हजार कोटींपर्यंत नेण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने केले आहे. आरोग्यावरील बजेट तीनपट करून चांगल्या सुविधा उपलब्ध केल्या आहेत, असे केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी सांगितले.

पुना लाइफस्पेस इंटरनॅशनलचे भूमिपूजन केंद्रीय गृहमंत्री शाह यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पुना हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटरचे विश्वस्त देविचंद के. जैन, राजकुमार चोरडिया, पुरुषोत्तम लोहिया आदी उपस्थित होते.

पुना लाइफस्पेस इंटरनॅशनलचे रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय १४ एकर क्षेत्रावर उभारले जाणार आहे. त्यासाठी ९०० कोटी रुपये खर्च येणार आहे. हे रुग्णालय पश्चिम महाराष्ट्र आणि पुण्यासाठी सेवेचे माध्यम बनेल, असे सांगून अमित शाह म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने आरोग्य क्षेत्रात चांगले काम केले आहे. अस्वच्छतेमुळे ७० टक्के आजार होत आहेत. त्यामुळे स्वच्छतेला त्यांनी प्राधान्य दिले आहे. देशात स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. देशभरात शौचालय उभारण्यासाठी अनुदान देण्याचे काम केले आहे. योगामुळे शरीर, मन, आत्मा चांगले राहते. फिट इंडिया हा उपक्रम राबविला आहे. देशातील ८० कोटी गरीब रुग्णांवर पाच लाखांपर्यंतचे उपचार केले जाणार आहेत. एमबीबीएसच्या ५१ हजार जागा होत्या. आता दुप्पट होऊन १ लाख १८ हजार झाल्या आहेत. कोरोनावरील लस तयार करण्यामध्ये आपल्या देशाचा समावेश आहे. भारताने ८७ देशांना कोरोनाची लस दिली, असेही शाह म्हणाले. राजकुमार चोरडिया यांनी प्रास्ताविक केले. पुरुषोत्तम लोहिया यांनी आभार मानले.

## शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा, जोपर्यंत कर्जमाफी नाही तोपर्यंत वसुली नाही-बच्चू कडू

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी आपल्या ठाम शैलीत पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे. ७/१२ कोरा करा, जोपर्यंत कर्जमाफी नाही तोपर्यंत वसुली नाही, अन्यथा उलटं टांगू, असा इशारा दिला आहे. बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी जूनमध्ये आंदोलन केले होते. मोझरीमधील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळी त्यांनी उपोषण केले होते.

महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी देतो, अशी घोषणा केली होती. त्यानुसार ती द्यावी अशी त्यांची मागणी होती. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना कडू यांची मनधरणी करण्यासाठी पोहोचले होते. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सुद्धा शिष्टाई केली होती. राज्य शासनाने यावर एक समिती स्थापन करून निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर कडू यांनी उपोषण स्थगित केले. मात्र समिती स्थापनेस होत असलेली दिरंगाई लक्षात घेता त्यांनी ७ जुलैपासून पुन्हा पदयात्रा काढण्याचा इशारा दिला. दरम्यान, कर्जमाफीच्या मुद्द्यावर तीन जुलैला मंत्रालयात बैठक लावण्यात आली आहे. महसूलमंत्री बावनकुळे बैठकीला उपस्थित राहतील असे बोलले जाते.

# सुषमा अंधारे, कुणाल कामरा विरोधात विधिमंडळात हक्कभंग प्रस्ताव मंजूर

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- गत विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान कॉमेडियन कुणाल कामरा आणि शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांच्यावर हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्याच्या कारवाईला जोर आला होता. आता, पावसाळी अधिवेशनात या दोघांविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव मंजूर झाला आहे. कॉमेडियन कुणाल कामराने आपल्या नया भारत या कॉमेडी शोमधून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर व्यंगात्मक टिका केली होती. कुणाल कामराने एकनाथ शिंदे यांच्या दाढी, चष्म्यावरुन आणि शिवसेना पक्षातील बंडावरुन केलेले विडंबनात्मक गाणे गायले. कुणाल कामराचा हा व्हिडिओ तुफान व्हायरल झाल्यानंतर शिवसैनिक चांगलेच संतप्त झाले. तर, दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटाकडून हा व्हिडिओ शेअर करण्यात आला होता. सुषमा अंधारेंनीही व्हिडिओ बनवला होता. त्यामुळे, या दोघांविरुद्ध हक्कभंग दाखल करण्यात आला होता, त्यास मंजुरी देण्यात आली आहे.

कुणाल कामराने जिथं हे गाणं गायलं, त्या स्टुडिओची काही शिवसैनिकांनी तोडफोड केली. तसेच, कामराविरुद्ध मुंबईतील काही पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता. तर शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी देखील कुणाल कामराचं गाणं म्हटल्याचा व्हिडिओ समोर आला. त्याचे पडसाद विधिमंडळाच्या सभागृहात देखील उमटले. त्यानंतर कुणाल कामरा आणि सुषमा अंधारे यांच्याविरोधात विधानपरिषदेचे सदस्य आमदार प्रविण दरेकर यांनी विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी हक्कभंग प्रस्ताव दाखल केला होता. आता सुषमा अंधारे आणि कुणाल कामरा यांच्या विरोधातील हक्कभंग स्वीकारण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.कुणाल कामरा आणि सुषमा अंधारेंविरोधात हक्कभंग मंजूर झाला आहे. त्यानुसार, आता कुणाल कामरा आणि सुषमा अंधारेंना सोमवारी नोटीस काढली जाणार असल्याने कॉमेडियन कामरा आणि शिवसेना नेत्या अंधारेंच्या अडचणी वाढल्या आहेत.

## ठाकरे कुटुंबाचे महाराष्ट्रातील योगदान मोठे-सुप्रिया सुळे

पुणे दि.४ (प्रतिनिधी)- ठाकरे कुटुंबाने महाराष्ट्रात मोठे योगदान दिले आहे. ठाकरे हे फक्त एक नाव नाही, तर एक ब्रँड आहे. त्यांच्या कुटुंबातील दोन सदस्य एकत्र आले, तर त्यांचे मनापासून स्वागत करू. कोणतीही गोष्ट मनापासून केली पाहिजे, अशा शब्दांत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी ठाकरे बंधूंच्या मनोमीलनावर शुक्रवारी भाष्य केले.

खासदार सुप्रिया सुळे शुक्रवार सकाळपासून हिंजवडी आयटी पार्कसह माण मारुंजी परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था, वाहतूक कोंडी आणि वाहतुकीच्या समस्येची पाहणी केली. त्यानंतर त्या बोलत होत्या. सुळे यांनी २६ जुलैपर्यंत हिंजवडीतील रस्ते दुरुस्त करण्यासाठी प्रशासनाला अल्टीमेटमदेखील दिला आहे. सुळे म्हणाल्या, की २६ जुलैपर्यंत परिस्थिती सुधारली पाहिजे. अन्यथा, आमचा नाईलाज होईल. हिंजवडीचा विकास झाला पाहिजे. हिंजवडी ग्रामपंचायत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत विलीन करण्याबाबत नागरिकांचे मत महत्त्वाचे आहे. वेळेत परिस्थिती सुधारली, तर हिंजवडीला येऊन संबंधित सरकारी अधिकाऱ्यांचे अभिनंदन करू, असेही त्यांनी सांगितले.

# भाषासक्तीच्या नावाखाली गुंडगिरी खपवून घेणार नाही; मुख्यमंत्री फडणवीसांची भूमिका

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- राजधानी मुंबईसह महाराष्ट्रात मराठीचा मुद्दा तापला असताना मनसे कार्यकर्त्यांनी २९ जूनच्या रात्री मराठी भाषा न बोलल्याच्या कारणावरून जोधपूर स्वीट्स अँड फरसाणचे मालक बाबूलाल चौधरी यांना मराठी भाषेचा अपमान केल्याच्या आरोपावरून मारहाण केली होती. बाबूलाल यांना मारहाण करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मीरा-भाईंदरमध्ये तणावाचं वातावरण निर्माण झालं. आता, मीरा भाईंदरमध्ये व्यापाऱ्याला मारहाण करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच, मराठी भाषेचा अभिमान असणं चुकीचं नाही, पण भाषेच्या नावाखाली गुंडगिरी खपवून घेणार नाही. भाषेवरुन वाद घालणाऱ्या, मारहाण करणाऱ्या आणि गुंडशाहीवर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

राज्य सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतल्यासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, त्रिभाषासूत्रीचा निर्णय स्वीकारणारे उद्धव ठाकरेच, त्यात उपनेत्याला ढकलणारे तेच, निर्णय कॅबिनेटमध्ये घेणारे तेच आणि समिती नेमणारे देखील तेच आहेत, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मराठीच्या मुद्द्यावरुन उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं. आम्ही याबाबत समिती नेमलेली आहे, त्याचा जो अहवाल येईल त्याची अंमलबजावणी केली जाईल, जी विद्यार्थ्यांच्या हिताची असेल. मुंबईत भाषेवरून व्यक्तींना होत असलेली मारहाण सहन केली जाणार नाही, आम्हालाही मराठी भाषा प्रिय आहे. पण, भाषेवरुन गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही, असेही फडणवीसांनी ठणकावून सांगितले.

## नाशिक जिल्हा बँकेच्या बैठकीत कृषिमंत्री कोकाटे अन् शेतकऱ्यांत बाचाबाची

नाशिक दि.४ (प्रतिनिधी)- राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी काही दिवसांपूर्वी कृषिमंत्रीपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकी असल्याचे वादग्रस्त विधान केले होते. त्यांच्या या विधानावरून शेतकऱ्यांनी शुक्रवारी त्यांना चांगलेच धारेवर धरले. यावेळी त्यांच्यात काहीशी बाचाबाचीही झाली.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची विशेष सर्वसाधारण सभा आज पार पडली. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे या बैठकीला हजर होते. त्यांच्यापुढेच ठेवीदार शेतकरी व बँकेचे प्रशासक समोरासमोर आले. यावेळी शेतकऱ्यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांवर टीका करताना अचानक कोकाटे यांना त्यांच्या ओसाड गावच्या पाटीलकी विधानासंबंधी धारेवर धरले. यामुळे बैठकीत एकच तणाव निर्माण झाला. पण परिस्थिती चिघळण्यापूर्वीच कोकाटेंनी कामकाज पुढे सरकवत हा विषय मागे टाकला.

यावेळी शेतकरी कोकाटेंना उद्देशून म्हणाले, माणिकराव कोकाटे साहेब विधानसभा निवडणुकीत कर्जमाफीची घोषणा झाली होती. त्याचे काय झाले? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कर्जमाफी जाहीर केली होती. पण अद्याप त्याची पूर्तता झाली नाही. शेतकरी अजूनही त्या आशेवर जगतो आहे. जिल्हा बँकेतील काही कर्मचारी फसवणूक करतात. त्यांच्यामुळे ही बँक अडचणीत सापडली आहे.

## आमदार संग्राम जगतापांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्यास हैदराबादेतून अटक

अहिल्यानगर दि.४ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप गेल्या काही महिन्यांपासून चांगलेच चर्चेत आहेत. अजित पवार सातत्याने सर्वधर्म समभाव आणि छत्रपती, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा घेऊन आपण पुढे जात असल्याचं सांगतात. मात्र, त्यांच्याच पक्षाचे आमदार असलेल्या संग्राम जगताप यांनी हिंदुत्त्ववादी भूमिका घेतल्याचं अनेकदा पाहायला मिळालं. विशेष म्हणजे जाहीरपणे भाषणं करत त्यांनी मुस्लिमांना लक्ष्य केल्याचंही दिसून आलं होतं. तर अजित पवारांनी बोलविलेल्या आमदारांच्या बैठकीतही त्यांनी दांडी मारल्याने संग्राम जगताप यांच्या मनात नेमकं काय? असा प्रश्न राजकीय वर्तुळातून समोर येत होता. त्यातच, दोन दिवसांपूर्वी संग्राम जगताप यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याने खळबळ उडाली होती. अखेर, धमकी देणाऱ्यास हैदराबाद येथून अटक करण्यात आली आहे, पण आरोपी मूळ बीडचा असल्याचीही माहिती आहे.

आमदार संग्राम जगताप यांचे खासगी स्वीय सहाय्यक सुहास शिरसाठ यांच्या मोबाईलवर टेक्स्ट मेसेजद्वारे संग्राम जगताप यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्यानंतर, स्वीय सहायकाच्या तक्रारीवरुन अहिल्यानगरमधील कोतवाली पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा देखील दाखल झाला. मोबाईलवर आलेल्या या मेसेजमध्ये 'संग्राम को दो दिन के अंदर खत्म करुंगा' असा थेट जीवे मारण्याचा इशारा देण्यात आला होता. हिंदुत्वासंदर्भातील भूमिका आणि वक्तव्यांमुळे आमदार जगताप चर्चेत असतानाचा हा मेसेज आल्याने पोलिसांनी देखील त्या दृष्टीने तपास सुरू केला होता. अखेर, अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने धमकी देणाऱ्यास हैद्राबाद येथील निजामाबाद तालुक्यातील धगगी या गावातून अटक केली आहे.

अनिस महमद हनीफ शेख, मूळचा चकलांबा, जिल्हा बीड येथील असून सध्या तो नारेगाव संभाजीनगर येथे वास्तव्यास आहे. धमकीच्या पार्श्वभूमीवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबादमध्ये सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतलं आहे.

## ठाकरे ब्रँडवर उपसभापती निलम गोऱ्हेंची सडकून टीका

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- राज्यात हिंदी सक्तीवरून ठाकरे बंधूंनी महायुती सरकारला दोन्ही जीआर रद्द करण्यास भाग पडल्यानंतर त्याचा विजयी मोळ मेळावा उद्या (५ जुलै) मुंबईमध्ये होत आहे. या मेळाव्यासाठी अवघ्या महाराष्ट्रात उत्सुकता असून शिवसेना आणि मनसेकडून या मेळाव्यासाठी जय्यत तयारी करण्यात येत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर उद्याच्या मेळाव्यामध्ये ठाकरे बंधू मराठीवरून कोणता संदेश देणार आणि भविष्यात एकत्र येणार का? याची सुद्धा चर्चा महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळामध्येच नव्हे तर देशाच्या राजकारणामध्ये रंगली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर उद्याचा मेळावा उत्सुकता वाढवणारा आहे. महाराष्ट्रामध्ये ठाकरे बँड कधी संपला जाणार नाही हे सुद्धा ठाकरे बंधूंनी काही दिवसांपूर्वी सूचित केलं होतं. आता याच मुद्द्यावरून शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या विधानपरिषदेच्या (पान ४ वर)

# दुबार पेरणीचे संकट टळले...

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात सर्वसाधारण ४९ लाख ७२ हजार ७२८ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेच २४ लाख ४५ हजार ९४९ हेक्टरवर म्हणजेच ४९.१९ टक्के क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी मराठवाड्यातील जे क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले, त्यामध्ये नांदेड जिल्ह्यासाठी ७ लाख ६१ हजार ५७६ हेक्टर, छत्रपती संभाजीनगरमधील ६ लाख ८१ हजार ९०३ हेक्टर, जालन्यातील ६ लाख ५१ हजार १७३ हेक्टर, बीडमधील ८ लाख ८ हजार ९४५ हेक्टर, लातूरमधील ५ लाख ८६ हजार १०१ हेक्टर, धाराशिवमधील ५ लाख ५४ हजार ३६० हेक्टर, परभणीतील ५ लाख ४ हजार ६८ हेक्टर, हिंगोलीतील ४ लाख १० हजार ३९८ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे.

त्यापैकी २४ लाख ४५ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी झाली आहे. पेरणी झालेल्या क्षेत्रामध्ये नांदेड जिल्ह्यात ४,८५,२८० हेक्टर, छत्रपती संभाजीनगरमधील ३,९४,९४९ हेक्टर, जालन्यातील १,९७,६६४ हेक्टर, बीडमधील १,९१,९०८ हेक्टर, लातूरमधील ४,३५,००१ हेक्टर, धाराशीवमधील ४,०६,०६६ हेक्टर, परभणीतील २,५५,७३७ हेक्टर व हिंगोलीमधील सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत ७९ हजार ३११, हेक्टर क्षेत्रावरील पेरणीचा समावेश आहे. मराठवाड्यात मागील दोन दिवसांत झालेल्या पावसामुळे पिके तरली आहेत. आता शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. काही ठिकाणी रिमझिम पाऊस झाला, त्यामुळे कोवळ्या पिकाला देखील जीवदान मिळाले आहे.

मराठवाडा व विदर्भात पाऊस नसल्याने बळीराजा संकटात सापडला होता. मराठवाड्यात तर कडक उन्हाळा असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याने नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यात दुबार पेरणीची भीती व्यक्त केली जात होती; परंतु अखेर निसर्गाने तारल्यामुळे नांदेड जिल्ह्यात २ दिवसांपूर्वी चांगलाच पाऊस झाला. नांदेड जिल्ह्यातील ३९ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने दुबार पेरणीचे संकट तूर्त तरी टळले आहे.

नांदेड जिल्ह्यातील ६ तालुक्यात चांगलाच पाऊस झाला. त्यामुळे बिलोली, कुंडलवाडी, हदगाव, नांदेड, भाकर, किनवट, माहूर या भागात शेतकऱ्यांना आता दुबार पेरणी करण्याची गरज नाही. नांदेड जिल्ह्यातील काही तालुक्यात परिस्थिती अजूनही कठीणच आहे. अशीच परिस्थिती हिंगोली व परभणी जिल्ह्यातही निर्माण झाली आहे. पाऊस नसला तर शेतकरी राजा परेशान होतो.

मराठवाड्यात तसेच विदर्भात पाऊस परतल्याने आनंदी-आनंद व्यक्त केला जात आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील दहेली मंडळात एकाच दिवसात १४७ मिलिलिटर पाऊस झाला. आणखी तीन दिवस मराठवाड्यात चांगला पाऊस राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे. विदर्भातील यवतमाळ, वाशिम तसेच बुलढाणा भागात पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. विदर्भातील या तीन जिल्ह्यांतील अनेक मार्ग ठप्प झाले आहेत. वर्धा जिल्ह्यात तर वीज पडल्याने दोन भावंडांचा जागीच मृत्यू झाला.

मराठवाड्यात दीर्घ खंडानंतर पावसाचे पुनरागमन झाले आहे. सर्वदूर मध्यम स्वरूपातील पाऊस सुरू असून आणखी दमदार पाऊस झाला तर उरलेल्या भागालाही दिलासा मिळणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद, कन्नड, सिल्लोड, फुलंब्री, वैजापूर या भागातही चांगलाच पाऊस झाला. हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी, औंढा नागनाथ, जिंतूर या ठिकाणी पावसाने चांगलीच हजेरी लावली. त्यामुळे या तीन भागातील दुबार पेरणी टळली आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यात दमदार पाऊस झाला. त्याठिकाणी देखील आता दुबार पेरणी करण्याची गरज नाही. शेतकरी पाऊस नसल्यामुळे आकाशाकडे डोळे लावून बसला होता. अनेक ठिकाणी बियाणेच बोगस निघाल्यामुळे पेरणी करूनही पिकाची उगवण झाली नाही.

मराठवाड्यात मूग, ज्वारी, कापूस, सोयाबीन, तूर, उडीद आदी पिके प्रामुख्याने घेतली जातात. सध्याही यापैकी सोयाबीनचे पीक घेण्यावर शेतकऱ्यांचा भर आहे. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात मात्र पावसाने हात आखडता घेतला आहे. ८ दिवसांपासून त्या ठिकाणी पावसाचा खंड पडला आहे.

मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत मे महिन्यात पाऊस झाला. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना मशागत करायलाही पूर्व मोसमी पावसाने निट संधी दिली नाही.

मात्र शेतकऱ्यांनी त्यानंतर पेरणीयोग्य मशागत केली. बीड जिल्ह्यात या महिन्यात १ जूनपासून सरासरी ५० टक्के पाऊस पडला. बीड जिल्ह्यात खरिपाचे सर्वसाधारण क्षेत्र ८ लाख ८ हजार हेक्टर आहेत. मात्र या तुलनेत साडेपाच लाखांच्या जवळपास पेरणी झाली. बीड जिल्ह्यात ६८ टक्के पेरणी उरकली आहे. नांदेड जिल्ह्यात ५ लाख हेक्टरवर पेरणी पूर्ण झाली आहे. खरीप हंगामासाठी ७ लाख ६१ हजार ५७६ हेक्टर क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले. त्यापैकी ४ लाख ८५ हजार २८० हेक्टरवर पेरणी झाली आहे.

# नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी सारखी अनेक गावे अजूनही मुलभूत सुविधांपासून वंचित का ?

**भारत** स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालेत त्याचबरोबर देशातील २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेशाचा विकास झाला.या राज्यात वेगवेगळ्या पक्षांचे सरकार आलेत आणि गेलेत.परंतू ते हेही सांगायला विसरले नाहीत की आम्ही विकास झपाट्याने केला असे नेहमीच सर्वच राजकीय पक्ष छाती ठोकून सांगतात. आपण महाराष्ट्राचा विचार केला तर अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु प्रत्येक राजकीय पक्ष स्वतःची पाठ थोपटण्यात अग्रेसर रहाला.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले.आज महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येऊन ६५ वर्षे झालीत.परंतू आजही राज्यातील अनेक भागांत मुलभूत सुविधांपासुन अनेक लोक वंचीत आहेत.त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी गाव.आजही सरकार अती दुर्गम भागात पोचलीच नाही;जर पोहचली असेलही परंतु तेथील विकासाकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचे चित्र नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी (ता.अक्कलकुवा) येथील भयावह परिस्थिती वरून लक्षात येते.नंदुरबार जिल्ह्यातील आमदार खासदार,पालकमंत्री अशा उच्च पदस्थ लोकप्रतिनिधींना अशा गंभीर समस्या कशा काय दिसत नाही? किंवा दिसल्या नाहीत?मतदारांकडे मतदान मांगतांना या गावात कोणीच गेले नसेल का?गेले असेल तर फक्त स्वार्थापोटी गेले असावेत ही बाब तेथील गंभीर परिस्थितीवरून सर्वांच्याच लक्षात येते. नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी ता.अक्कलकुवा येथील पूल नसल्याने



परिसरातील डोंगरपाड्यावरील विद्यार्थ्यांना दररोज झाडाच्या फांदीवरून दोरीच्या सहाय्याने तोल सांभाळुन जीव धोक्यात घालत पलीकडच्या जिल्हापरिषद शाळेत जावे लागते.या गावात ४०० लोकांची वस्ती आहे स्वतंत्रपूर्व काळापासून तेथे रस्ता नाही ही कीती मोठी शोकांतिका म्हणावी लागेल. आज औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड होत आहे अशा परिस्थितीत डोंगराच्या पायथ्याशी किंवा शेजारी राहणाऱ्यां गावकऱ्यांना आपला जीव धोक्यात टाकून जगावे लागत आहे ही विकसित महाराष्ट्राची शोकांतिकाच म्हणावी लागेल.आज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात पाऊसाने थैमान घातले आहे अशा परिस्थितीत नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी ता.अक्कलकुवा येथील नदीवर पूल नसल्याने तेथील परिसरातील डोंगरपाड्यावरील विद्यार्थ्यांना दररोज जीव धोक्यात टाकून शिक्षणासाठी झाडाच्या फांदीवरून दोरीच्या सहाय्याने शाळेत जावे लागत आहे.म्हणजे शिक्षणासाठी चिमुकल्यांना कीती मोठा धोका पत्करावा लागत आहे ही बाब नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी गावातील जिवंत उदाहरण महाराष्ट्रासह देशासमोर आहे. विद्यार्थी तसेच ग्रामस्थांना केलखाडी गावात येण्यासाठी आधी डोंगर उतरून नदीकाठावर यावे लागते.त्यानंतर झाडांच्या फांदीवरून नदी पार करावी लागते.तेथील ग्रामस्थ म्हणतात की आमच्या पाड्यापर्यंत जाण्यासाठी धड रस्ता नाही.पलीकडे केलीपाडा येथे जाण्यासाठी नदीवर पूल नाही.त्यामुळे जीवघेणी कसरत रोजचीच झाली आहे.रस्ता आणि पुल बांधण्यासाठी ग्रामस्थ अनेक वर्षांपासून प्रशासनाकडे पाठपुरावा करून मागणी करीत आहेत मात्र अजूनही ग्रामस्थांना प्रशासनाकडुन दाद मिळाली नाही याचे दुःख आजही त्यांना होत आहे.२० फूट खोल केलखाडी नदी व २४ फूट लांब झाडांचा रस्ता किती भयानक व कठीण परिस्थिती म्हणावी लागेल.मी या लेखाच्या माध्यमातून सरकारला व पक्ष-विपक्षांना आग्रह करतो की सध्या पावसाळी अधिवेशन सुरू आहे.

जर माझा आवाज या लेखाच्या माध्यमातून आपणापर्यंत पोहचला असेल तर आपण ताबडतोब नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी गावात जाऊन तेथील संपुर्ण परिस्थिती युध्दपातळीवर हाताळावी जेणेकरून तेथील ग्रामस्थांना व चिमुकल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दिलासा मिळु शकेल व त्यांचे जीवन आनंददायी होईल.त्याचल्यमाणे माननीय मुख्यमंत्री, स्थानिक प्रशासन, सरकार, आमदार -खासदार यांनी अती दुर्गम भागांची पहाणी करावी व संपूर्ण मुलभूत सुविधांची पूर्तता करून तेथील ग्रामस्थांना विकासाच्या प्रवाहात आणावे ही माझी सरकारला कळकळीची विनंती आहे.

केलखाडीतील ग्रामस्थ व विद्यार्थी म्हणतात सांगा, आमची शाळेत जाण्याची समस्या कोणत्या भाषेत सांगावी! त्यामुळे माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पुन्हा विनंती करतो की अशा दुर्गम भागाकडे आपण जातीने लक्ष द्यावे जेणेकरून तेथील ग्रामस्थांना दिलासा मिळेल.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# स्कोडा ऑटोद्वारे ५ लाख कारची निर्मिती

## उत्पादन क्षेत्रातील स्थान अधिक मजबूत केले

मुंबई: स्कोडा ऑटोने भारतातील अत्याधुनिक उत्पादन सुविधाअंतर्गत ५ लाख कारची निर्मिती करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. स्कोडा ऑटो फोक्सवॅगन ग्रुप (डअऋऋ)चे भारताप्रती असलेले वचनबद्धतेचे दर्शन या यशातून होते असे कंपनीने यादरम्यान म्हटले आहे. भारतीयांची कारागिरी आणि स्थानिकीकरणावरील त्यांचा विश्वासही यातून दिसून येतो. या व्यवहारात जागतिक दर्जाची गुणवत्ता आणि सुरक्षेवर भर देण्यात आला आहे.

२००१ मध्ये स्कोडाने छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) येथील त्यांच्या प्रकल्पातून पहिली ऑक्टेव्हिया बाजारात आणली. तेव्हापासून या ब्रँडचा भारतातील विस्तार वाढत गेला. तसेच त्यांच्या उत्पादनातही विविधता आली. ऑक्टेव्हिया, लॉरा, सुपर्ब आणि कोडियाकसारख्या प्रतिष्ठित गाड्यांपासून ते कुशाक, स्लाव्हिया आणि पहिली सब-४-मीटर किलाक यासारख्या नव्या जमान्यातील लोकप्रिय गाड्यांपर्यंत ही प्रगती आहे. स्कोडाने केवळ गाड्याच नव्हे तर भारतीय वाहन प्रेमींशी एक पक्के भावनिक नाते जोडले आहे. बदलत्या काळातील आवडीनिवडीनुसार गाड्या उपलब्ध करून देत हे नाते अधिक मजबूत केले आहे असे कंपनीने लाँच दरम्यान प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटले आहे.

भारतात उत्पादन झालेल्या कार केवळ देशांतर्गत वापरासाठी नाहीत. स्कोडा ऑटोच्या जागतिक ध्येयांना आता भारतातील उत्पादन क्षमतांची मदत मिळत आहे. कारण ग्रुपच्या नुकत्याच सुरु झालेल्या व्हिएतनाममधील उत्पादन प्रकल्पात भारतात उत्पादित झालेले सुटे भाग जोडले जात आहेत. या सुविधेच्या माध्यमातून व्हिएतनाम करिता कुशाक आणि स्लाव्हिया कारचे स्थानिक पातळीवर उत्पादन केले जाईल. यामुळे स्कोडाच्या जागतिक विस्तारात भारत एक धोरणात्मक निर्यात केंद्र अशा मजबूत भूमिकेत असेल. भारत सरकारच्या मेक इन इंडिया अर्थात 'भारतासाठी आणि जागतिक बाजारपेठांसाठी उत्पादन' या महत्त्वाकांक्षेशी हे सुसंगत आहे.

स्कोडा ऑटो उत्पादन आणि लॉजिस्टिक्स ए.एस. बोर्ड सदस्य, आंद्रे डिक म्हणाले, ङ्गभारतात ५ लाख कार निर्मिती करण्याचा टप्पा गाठणे हे भारताप्रती असलेल्या आमच्या अतूट वचनबद्धतेचे आणि उत्कृष्ट कार्यान्वयन असण्याच्या आमच्या धोरणात्मक दूरदृष्टीचे अभिमानास्पद प्रतीक आहे. स्थानिक अभियांत्रिकी कौशल्याला प्रोत्साहन देत आणि जागतिक उत्पादन प्रक्रियेच्या मदतीने आम्ही एक अशी इकोसिस्टिम तयार केली आहे, जी वेगवान, विस्तारण्यासाठी सज्ज आणि वेगाने बदलणाऱ्या वातावरणाशी समरस होणारी आहे. तसेच ती सर्वोच्च आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करणारी आहे. या यशातून जागतिक दर्जाची नवनिर्मिती तसेच भारताचे वाढते औद्योगिक सामर्थ्य यांचा मिलाप दिसून येतो.'

स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडियाचे सीई आणि व्यवस्थापकीय संचालक पियूष अरोरा म्हणाले, 'हे यश केवळ ५ लाख कार निर्मितीपुरतेच मर्यादित नाही, तर यातून ५ लाख नाती निर्माण झाली असून ती जपली जात आहेत. आमच्या उत्पादन प्रकल्पातून बाहेर पडणारी प्रत्येक कार अतुलनीय दर्जासह युरोपियन अभियांत्रिकीचे डीएनए धारण केलेली असते. ती अत्यंत सटिक तयार केलेली असून उत्कृष्ट दर्जाची आराम सुविधा, सुरक्षितता, तंत्रज्ञान आणि ड्रायव्हिंग डायनॅमिक्सची सुविधा यातून मिळते. हे यश आमच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच ग्राहकांचेदेखील आहे. कारण यातून केवळ मोबिलिटी तयार केली जात नाही तर भारत हा देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांसाठी काय निर्माण करू शकतो, यासंबंधीचा विश्वास आम्ही तयार करत आहोत. आमच्या समूहाच्या विस्तारात भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. '

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, स्कोडाने भारतातील दोन प्रमुख निर्मिती प्रकल्पांची क्षमता एकत्र करून ५ लाख युनिट्सचा टप्पा ओलांडला आहे. यापैकी अंदाजे ७० टक्के वाहने पुण्यातील प्रकल्पात तयार करण्यात आली आहेत. तर उर्वरीत वाहने छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्पात तयार झाली. स्कोडा ब्रँडने मार्च २०२५ मध्ये सर्वाधिक मासिक विक्रीची नोंद केली. तर एकाच महिन्यात७४२२ युनिट वितरीत केले आहेत.

# प्रशासनाला सहकार्य करा - मुख्याधिकारी भागवत बिघोत यांचे आवाहन



**वैजापूर नगर परिषदेच्या सभागृहात शुक्रवारी आयोजित बैठकीत मुख्याधिकारी भागवत बिघोत यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.**

वैजापूर, दि. ७ (प्रतिनिधी) - नगर परिषदेचे मुख्याधिकारी म्हणून २५ जुन रोजी कार्यभार स्वीकारल्यापासून शहरातील स्वच्छतेसह अन्य सर्व नागरी समस्यांवर लक्ष केंद्रित केले असून यावर तातडीने कार्यवाही सुरु केली आहे. मात्र, यात नागरिकांचा सक्रिय सहभाग असणेही तितकेच गरजेचे आहे. त्यामुळे नागरिकांनी सर्व नियम पाळून प्रशासनाला सहकार्य करावे जेणेकरून शहराची विस्कटलेली घडी पूर्ववत करता येईल असे प्रतिपादन मुख्याधिकारी भागवत बिघोत यांनी केले. वैजापूर नगर परिषदेच्या फुले आंबेडकर सभागृहात शुक्रवारी (४ जुलै) आयोजित बैठकीत ते बोलत होते.

यावेळी काही दिवसांपूर्वीच वैजापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक म्हणून कार्यभार स्वीकारलेले सत्यजीत ताईतवाले यांनीही नागरिकांनी सहकार्य केल्यास प्रशासनाला कुठलीही अप्रिय कारवाई करावी लागणार नाही. प्रशासन, लोकप्रतिनिधी व नागरिकांनी यांच्या सहभागातून शहर स्वच्छ व सुंदर करू. संपूर्ण जिल्ह्यात क्रमांक एकचे शहर करू अशी अपेक्षा ताईतवाले यांनी व्यक्त केली. या बैठकीत माजी नगराध्यक्षा शिल्पा परदेशीं यांनीही प्रशासनाला सूचना केल्या.

शहरातील स्वच्छता, नवीन भाजी मंडईतील रस्त्यावरील फळ व भाजी विक्रेते, टिळक रस्त्यावरील वाहतूक, रस्त्यावरील अतिक्रमणे, शहरांत ठिकठिकाणी लावण्यात आलेली पोस्टर्स व बॅनर्स, वाहन पार्किंग, मोकाट जनावरे याबाबत दामोदर पारीक, प्रशांत त्रिभुवन, दशरथ बनकर, सय्यद हिकमत, दिलीपसिंह राजपूत, स्वप्नील जेजुरकर, रियाजउद्दीन शेख आदींनी सूचना मांडल्या. त्यावर कार्यवाही करण्याचे आश्वसन भागवत बिघोत व सत्यजित ताईतवाले या दोघांनी दिले.

शहरात पोस्टर व बॅनर लावण्यासाठी सात जागा निश्चित करण्यात आल्या असून या ठिकाणी पूर्व परवानगीशिवाय कुठलेही पोस्टर लावता येणार नाही. शिवाय खासगी ठिकाणीही पोस्टर लावण्यासाठी परवानागी घ्यावी लागेल असे प्रशासनाने स्पष्ट केले. या बैठकीला दिनेश राजपूत, सलीम वैजापूरी, राजेश गायकवाड, गौरव दोडे, अल्ताफ बाबा यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

# डेंग्यु : नियंत्रण व उपाययोजना

**दरवर्षी** सातत्याने डेंग्यु रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. जगामध्ये जवळपास ५ कोटी लोकांना या रोगाचा संसर्ग होतो. भारतातही हा रोग मोठ्या प्रमाणात आढळून येतो. या रोगामध्ये मृत्यू सुद्धा होतात. शहरी व दाट लोकवस्तीच्या भागात या रोगाचे प्रमाण अधिक आहे. या आजाराचा फैलाव ग्रामीण भागामध्ये सुद्धा आहे. या रोगाचीक साथ पावसाळ्यात जास्त प्रमाणात होते.

हा रोग विषाणूजन्य रोग (अरबो व्हायरस) आहे. डेंग्यु विषाणूचे डेंग्यु - १, डेंग्यु - २, डेंग्यु - ३, डेंग्यु - ४ असे चार प्रकार आहेत.

**प्रसार :-** या रोगाचा प्रसार दुषित एडीस इजिप्ती नावाची मादी डास चावलेल्यामुळे निरोगी व्यक्तीला डेंग्यु रोग होतो. डेंग्यु विषाणुयुक्त डास मरेपर्यंत दुषित राहून अनेक व्यक्तीना चावून या रोगाचा प्रसार करतो. डासाच्या शरीरात डेंग्यु विषाणुची वाढ साधरणत: ८ ते १० दिवसांत पूर्ण होते. या रोगाचे प्रसारक एडिस इजिप्ती डास साठविलेल्या स्वच्छ पाण्यांत उदा. रांजण माठ, कुलर्स, पाण्याचे हौद, घराच्या छतावरील टाकाऊ वस्तु, नारळाच्या कुरवंट्या, टायर इ. मध्ये पैदा होतात. हे डास दिवसा चावतात. या डासांच्या पायांवर काळे पांढरे रिंग असतात. म्हणून या डासांना टायगर मॉस्क्युटो सुद्धा म्हणतात.

जीवनचक्र :- एडिस इजिप्ती डासाची वाढ चार प्रकारामध्ये होते. उदा. अंडी, अळी, कोष, डास

अधीशयन काळ :- ५ ते १० दिवसांचा आहे.

**आजाराची लक्षणे :-**

अ. डेंग्यु ताप -एकाएकी तीव्रताप, तीव्र डोके दुखी, स्नायुदखी, सांधेदुखी, उलट्या होणे.दुसऱ्या दिवसापासून तीव्र डोळे दुखी, अशक्तपणा भूक मंदावणे, ताप कमी जास्त होणे.अंगावर पुरळ येणे.

**ब.रक्तस्त्रावयुक्त डेंग्यु ताप (डेंग्यु हिमोरेजिक फिचर)**

१. डेंग्यु तापाची वरीलप्रमाणे लक्षणे आढळून येतात.

२. त्वचेखाली रक्तस्त्राव होणे.

३. नाकातून रक्तस्त्राव होणे. रक्ताची उलटी होणे.

४. रक्तमिश्रीत किंवा काळसर रंगाची शौचास होणे. पोट दुखणे.

५. रक्तस्त्रावयुक्त डेंग्युताप बहुतांशी १५ वर्षाखालील मुलांना होतो. मोठ्या व्यक्तींनाही होऊ शकतो.

क) डेंग्यु शॉक सिंड्रोम:- डेंग्यु मध्ये जेव्हा रुग्ण बेशुद्ध होतो त्याला डेंग्यु शॉक सिंड्रोम असे म्हणतात यामध्ये मृत्यूचे प्रमाण जास्त असते.

**रोग निदान**

रक्तजल नमुना तपासणी:- रक्तजल चाचणी सुक्ष्मजीव शास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, (घाटी) छत्रपती संभाजीनगर येथे तपासणी करुन निश्चित रोगनिदान होते.

**उपचार:-** या आजारावर निश्चित असे उपचार उपलब्ध नाहीत. वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्लानुसार वेदनाशामक औषधे व विश्रांती घेणे आवश्यक आहे. अतिशय घाम येणे, वारंवार उलट्या होणे, जिभेला कोरड पडणे अशा परिस्थितीत ओ.आर.एस. (मीठ साखर पाणी) द्रावणाचा वापर करावा.

**दक्षता:-** टॅब ॲस्परीन, ब्रुफेन ई औषधी देऊ नयेत. वैद्यकीय अधिकारी यांच्या देखेरेखीखाली औषधोपचार घेणे, रक्तस्त्रायुक्त डेंग्युताप (डेंग्यु हिमोरेजिक फिवर) व डेंग्यु शॉक सिंड्रोम या रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करणे आवश्यक आहे.

प्रतिबंधात्मक उपाय योजना :-

१. **सर्व्हेक्षण :-** किटकशास्त्रीय सर्व्हेक्षण करुन हाऊस इंडेक्स, कंटेनर इंडेक्स, ब्रॅटय इंडेक्स काढण्यात येऊन त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते. प्रत्यक्ष सर्व्हेक्षण अंतर्गत रक्त नमुन व रक्तजल नमुने घेऊन रुग्णांचा शोध घेऊन औषधोपचार करण्यांत येतो.

२. **डास अळी व डास नियंत्रण :-** डास अळी नियंत्रण ही सर्वात महत्वाची कृती आहे. हिवताप, डेंग्यु व चिकनगुनिया चे डास स्वच्छ पाण्यावर अंडी घालतात.

३. **डासोत्पती स्थाने :-** पावसाळ्यात साचलेली डबकी, रांजण, हौद, पाण्याच्या टाक्या, कुलर, रिकामे टायर, नारळाच्या करवंट्या इ.

४. डासोत्पती स्थाने नष्ट करण्यासाठी आठवड्यातून एकादा पाणी साठे रिकामे करुन कोरडा दिवस पाळण्यात यावा.

५. साचलेली डबके व नालया वाहत्या कराव्यात. खड्डे बुजविण्यांत यावेत. शक्य नसल्यास या पाण्यावर आठवड्यातून एकदा रॉकेल, टाकाऊ ऑईल टाकण्यात यावे.

६. **ॲबेटीग :-** आरोग्य विभागामार्फत घरातील सांड पाण्याचे रिकामे न करता येणारे पाणीसाठ्यात योग्य प्रमाणात ॲबेटीग केले जाते.

७. मच्छरदाणीचा वापर करण्यात यावा.

८. **जैविक उपाय योजना :-** डासोत्पत्ती स्थानात गप्पीमासे सोडण्यात येतात. हे मासे डासांच्या अळ्या खातात. सर्व आरोग्य संस्थेत गप्पी मासे मोफत मिळतात.

९. धुर फवारणी :- उद्रेकग्रस्त भागात धुर फवारणी केली जाते. आठवड्याच्या अंतराने दोनदा केली जाते.

माहितीस्रोतः- **आर.बी. ढोले,**
जिल्हा हिवताप अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर
माहिती संकलनः- जिल्हा माहिती
कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

## देशमूखनगर येथे आठ दिवसीय सिद्धचक्र महामंडल विधानास धर्म ध्वजारोहणाने प्रारभ

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) – प्रतिनिधी १००८ मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर, १०८ उपाध्याय विरंजन सागरजी महाराज ससंघ सानिध्यामध्ये आठ दिवसीय श्री श्री सिद्धचक्र महामंडळ विधानाचे आयोजन करण्यात आले. सुरुवात आजपासून ३ जुलै २०२५ रोजी झाली सकाळच्या सत्रात भगवंताचे अभिषेक, पूजन, धर्म ध्वजारोहण, तदनंतर विधानासाठी सौधर्म इंद्र, कुबेर इंद्र, यज्ञ नायक आणि इतर इंद्रांचे निवड झाली यामध्ये इंद्राचा मान सौ. शीला झुंबरलालजी. रावका परिवार, सौ रिचा विनीत लोहाडे, सो मोहिनी अजित पाटणी , सौ वैशाली नितीन छाबडा व सौ सुषमा रमणलाल पाटणी यांना इंद्र आणि इंद्रायणी बनण्याचा मान मिळाला व धर्म ध्वजारोहण करण्याचा मान सौ. प्रिया राहुल शहा परिवार तसेच मंडप उदघाटन सौ ज्योती धरमचंदजी पहाडे यांना मिळाला. यावेस शांती



आणि सुख प्राप्तीसाठी सिद्धचक्र विधानाचे आयोजन केले आहे, असे उपाध्याय विरंजन सागर जी महाराज यानी विधाना प्रंसगी उदगारले. विधानाच्या यशस्वीतेसाठी समस्त देशमुख नगर आणि संभाजीनगर दिगंबर जैन समाज परिश्रम घेत आहेत.

# एकादशीला पंढरपूर येथे भव्य वारकरी महाअधिवेशन!

पंढरपूर, दि. ४ (प्रतिनिधी) – प्रतिवर्षी लक्षावधी वारकरी आषाढी, कार्तिकीच्या निमित्ताने पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होतात. ‘लोचनात त्रिभुवन अवघे लेकरांस गवसुन जाय माझी पंढरीची माय, माझी पंढरीची माय’, असे म्हणत वारकर्यांच्या दिंड्या पंढरपूर येथे विसावत आहेत. वारकरी संप्रदायाचे धर्मकार्य आणि राष्ट्रनिष्ठा ही महाराष्ट्राची खरी ओळख आहे. गेली अनेक शतके वारकरी संप्रदाय नैतिक मूल्ये, संस्कृतीरक्षण आणि देशभक्ती यांची शिकवण देत आला आहे.

आजच्या काळातही धर्म, संस्कृती आणि राष्ट्र यांच्या हितासाठी वारकरी समाज अग्रभागी आहे. महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय मोठ्या प्रमाणात असूनही अद्याप पंढरपूर आणि आळंदी येथील तीर्थक्षेत्रांना म्हणाव्या अशा सुविधा नाहीत. याचसमवेत आळंदी येथे प्रस्तावित असलेला कत्तलखाना, वारीत होणारी घुसखोरी, संतांच्या श्लोकांचा चुकीचा अर्थ लावून लोकांची दिशाभूल करणे यांसह अन्य प्रश्नांचा वाचा फोडणे यांसह जाज्वल्य भक्ती अनब राष्ट्रनिष्ठा यांच्या भूमि केतून, वारकरी ऐक्य साधून महत्त्वाच्या मागण्या शासनाकडे कराव्यात, यासाठी एकादशीला (६ जुलैला) पंढरपूर येथे भव्य वारकरी अधिवेशन घेण्यात येणार आहे.

हे अधिवेशन सद्गुरु श्री गंगागिरी महाराज मठ, भक्तीमार्ग, जनकल्याण हॉस्पिटलच्या शेजारी, पंढरपूर येथे




दुपारी १ ते ३.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज या अधिवेशनाचे अध्यक्ष असून या अधिवेशनात ज्येष्ठ किर्तनकार संतवीर ह.भ.प. बंडातात्या कराडकर, महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वरशास्त्री महाराज आणि सचिव ह.भ.प. नरहरी महाराज चौधरी, पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. शेखर मुंदडा, जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. माणिक महाराज मोरे, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, ह.भ.प. छोटे कदम माऊली, ह.भ.प. नरेंद्र महाराज मस्के, श्रीक्षेत्र अपेगाव येथील ह.भ.प. विष्णु महाराज अपेगावकर, अखिल भारतीय संत समितीचे प्रदेश महामंत्री स्वामी भारतानंद सरस्वती महाराज, महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे कोकण प्रांताध्यक्ष ह.भ.प. भगवान महाराज कोकरे, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे ह.भ.प. मारुति महाराज तुनतुने आणि कार्याध्यक्ष ह.भ.प. बापू महाराज रावकर, हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगडचे राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांसह संत- महंत, ह.भ.प., धर्माचार्य, हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. या अधिवेशनात धर्मरक्षणार्थ कार्यरत धर्मरक्षकांचे सन्मान करण्यात येणार आहेत. तरी या अधिवेशनासाठी मोठ्या संख्येने वारकरी-भाविक यांनी उपस्थित रहावे, तसेच अधिक माहितीसाठी श्री. राजन बुणगे – ९७६२७२१३०४ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिवेशनात चर्चा केले जाणारे आणि मार्गदर्शन केले जाणारे वारकर्यांचे जिव्हाळ्याचे विषय

१. पंढरपूर, देहू, आळंदी, पैठण, मुक्ताईनगर यांसह सर्व तीर्थक्षेत्रे कायम स्वरूपी मद्य आणि मांस यांपासून मुक्त करावीत, तसेच या सर्व तीर्थक्षेत्री १० किलोमीटर परिसरात अहिंदूंच्या धर्मप्रसारावर बंदी आणावी !

२. संत, संत-वांयय, राष्ट्रपुरुष, धर्म, देवता आदींचा अवमान कर्णायांवर कठोर कारवाई होण्यासाठी ईशनिंदा प्रतिबंधक कायदा लागू करावा !

३. या श्लोकांचा चुकीचा अर्थ लावून वारीचे वातावरण कलुषित कर्णायांना शासनाने कायमचा प्रतिबंध करावा.

४. गोहत्या आणि गोतस्करी रोखण्यासाठी महाराष्ट्रातील गोहत्या प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी !

५. हिंदु युवतींचे रक्षण होण्यासाठी येत्या पावसाळी अधिवेशनात ‘लव्ह जिहाद’विरोधी कायदा तात्काळ संमत करावा.

६. इंद्रायणी आणि चंद्रभागा या नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना करावी !

## प्रवीण बागडे ‘विकसित कृषी संकल्प अभियान २०२५’ करीता सन्मानित

नागपूर, दि. ४ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (माफसु) च्या विस्तार शिक्षण विभागात कार्यरत स्विय सहायक प्रवीण बागडे यांना २९ मे ते १२ जून २०२५ दरम्यान केंद्र सरकारच्या ‘विकसित कृषी संकल्प अभियान २०२५’ चा विद्यापीठाचा अहवाल तयार करणेकरीता सक्रिय सहभागासाठी डॉ. अनिल भिकाने, संचालक, विस्तार शिक्षण यांच्या निरोप समारंभ प्रसंगी पुष्पगुच्छ आणि सम्मानपत्र प्रदान करुन सन्मानित करण्यात आले. यापूर्वी सुध्दा त्यांच्या उल्लेखनीय कार्य, उत्साह आणि निष्ठेसाठी ‘उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार’ आणि ‘उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार’ प्रदान करुन गौरविण्यात आले. त्यांच्या लागोपाठ यशस्वी प्रयत्नांचे फार कौतुक केले जाते.



देशभर ‘विकसित कृषी संकल्प अभियान’ हा राष्ट्रीय अभियान सुरु करण्यात आला होता, जो भारतीय कृषीला वैज्ञानिक पद्धती, शाश्वत पद्धती आणि शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाच्या माध्यमातून अद्यावत करण्यासाठी झोकून दिले.

ज्याचे मार्गदर्शन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री, मा. श्री. शिवराज सिंह चौहान आणि भारतीय कृषी संशोधन परिषद (भाकृअप) यांनी कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पाडले. याप्रसंगी विस्तार विभागाचे तांत्रिक अधिकारी डॉ. गीतांजली ढुमे, डॉ. सारीपुत लांडगे, श्री मोहन कापसे, गौरी भदोरिया यांना सुध्दा त्यांच्या समर्पित कार्याबद्दल आयोजित कार्यक्रमात पुष्पगुच्छ आणि सम्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## सौर पंप शक्य नसल्यास पारंपरिक कृषी पंप देणार

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – राज्य शासनाने सौर ऊर्जेवर आधारित कृषी पंप देण्यावर भर दिला आहे. मात्र भौगोलिक परिस्थितीनुसार सौर पंप देणे शक्य नसल्यास त्या ठिकाणी पारंपरिक कृषी पंप देण्याबाबत शासन विचार करेल. शेतकऱ्यांसाठी कृषी पंपांना वीज जोडणी देण्यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी माहिती ऊर्जा राज्यमंत्री बोर्डीकर-साकोरे यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतात लावण्यात आलेल्या सीआरआय कंपनीच्या सोलार पंपाच्या तक्रारीबाबत मुद्दा उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य शेखर निकम यांनीही सहभाग घेतला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत देशातील ५० टक्के वीज अपारंपरिक स्त्रोतांतून निर्मित करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. त्याला अनुसरून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी, यासाठी राज्यातही सौर ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन दिले असून मागेल त्याला सौर पंप देण्याची योजना सुरू केली आहे. विशेष म्हणजे सौर पंप घेणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदान दिले जात असल्याचेही राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर-साकोरे यांनी सांगितले.

चंद्रपूर जिल्ह्यात सी.आर.आय. कंपनीमार्फत लावण्यात आलेल्या सौर कृषी पंपांबाबत आलेल्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन कंपनीला १३ लाखाचा दंडही करण्यात आला असल्याचेही राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर-साकोरे यांनी यावेळी सांगितले. या कंपनीच्या सौर कृषी पंपांबाबत १८३ शेतकऱ्यांनी ५४४ तक्रारी नोंदवल्या होत्या. यातील ५४२ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून, उर्वरित दोन तक्रारी पाण्याचा स्त्रोत कोरडा झाल्यामुळे निर्माण झालेल्या आहेत. जिथे पाण्याची पातळी खालावली आहे, अशा ठिकाणी बुस्टर पंप बसवून नदी किंवा जलस्रोतांमधून शेतापर्यंत पाणी पोचविण्यात येत आहे, असेही राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर-साकोरे यांनी सांगितले.

## जिल्हा ग्रंथालय व अभ्यासिका सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) – जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयामार्फत ग्रंथालय, अभ्यासिका या सेवा दिल्या जातात. या सेवांचा संस्थेत येऊन विनामूल्य लाभ घेता येतो तसेच सभासद होऊन घरी पुस्तके नेऊन सशुल्क लाभ घेता येतो. या सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सु. धों.साबळे यांनी केले आहे.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाचे २६, ग्रंथालय सदन, राधामोहन कॉलनी, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे ग्रंथालय व अभ्यासिका आहे. ग्रंथालयात कथा, कादंबरी, काव्यसंग्रह, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परीक्षाविषयक ग्रंथ व विविध विषयांवरील दर्जेदार अशी १७ हजार ९५४ ग्रंथ उपलब्ध असुन दैनिके, नियतकालिके व इतर वाचनीय साहित्य उपलब्ध आहे. स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका देखील असुन वाचक व विद्यार्थी ग्रंथालयात बसुन ग्रंथ, दैनिके व नियतकालिकांचे मोफत वाचन करुन शकतात.

ग्रंथ घरी घेवुन वाचन करावयाचे असल्यास ग्रंथालयाचे सभासद होणे आवश्यक आहे.

वैयक्तिक सभासदाप्रमाणेच वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार करणारी जिल्हयातील कुठलीही नोंदणीकृत संस्था जिल्हा ग्रंथालयाची संस्था सभासद होऊ शकते. जिल्हा ग्रंथालयाचे वैयक्तिक सभासद होणेकरीता अनामत रक्कम ५०० रुपये (परतावा) तर अर्ज व प्रवेश शुल्क ११० रुपये (व्दिवार्षिक), तसेच संस्था सभासद होणेसाठी अनामत रक्कम २५०० रुपये (परतावा) व अर्ज व प्रवेश शुल्क ७७५ रुपये (व्दिवार्षिक) इतके आहे. तरी विद्यार्थी, नागरीकांनी ग्रंथालयाचे सभासद होवुन वाचन सेवेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सु. धों.साबळे यांनी केले आहे.

## २५ जुलैपासून रेल्वेची रामायण यात्रा पर्यटन ट्रेन सुरू

मुंबई : भगवान रामाशी संबंधित धार्मिक स्थळांना भेट देऊ इच्छिणाऱ्या यात्रेकरूंसाठी इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशनने २५ जुलै रोजी अयोध्या ते रामेश्वरम अशी रामायण यात्रा ट्रेन चालवणार आहे.



दिल्लीच्या सफदरजंग स्टेशनपासून सुरू होणाऱ्या या प्रवासांतर्गत यात्रेकरूंना अयोध्या, प्रयागराज, चित्रकूट, सीतामढी, जनकपूर, शृंगावेरपूर, नाशिक, हम्पी ते रामेश्वरमपर्यंत भगवान रामाशी संबंधित ठिकाणांना भेट देण्याची आणि प्रभू श्री रामाचे दर्शन घेण्याची संधी मिळणार आहे. जिथे यात्रेकरूंना रामजन्मभूमी मंदिर, हनुमान गढी, राम की पायडी पाहण्याची संधी मिळणार आहे. यानंतर, भारत-हनुमान मंदिर, भरत कुंड, राम-जानकी मंदिर, जनकपूर धनुष धाम मंदिर आणि परशुराम कुंड, सीतामढी मधील जानकी मंदिर आणि पुनौरा धाम, राम रेखा घाट, रामेश्वर मंदिर, मनकत मंदिर, रामेश्वर मंदिरांना भेट देण्याची सुवर्णसंधी मिळेल.

## ज्यातील सर्वच शाळांमधील कार्यरत चतुर्थश्रेणी कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर शिपाई भत्ता लागू होणार

मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी) – राज्यातील मान्यताप्राप्त सर्व खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी आकृतीबंध लागू करण्याऐवजी विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे प्रतिशाळा शिपाई भत्ता लागू करण्यात आला असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी गुरूवारी विधान परिषदेत दिली. अस्तित्वातील चतुर्थश्रेणी कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर हा भत्ता लागू होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आ. अरुण लाड यांनी शिपाई पद कंत्राटी ऐवजी नियमित पद्धतीने भरण्यात यावे याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत आ. जयंत आसगावकर, इद्रीस नायकवडी, एकनाथ खडसे, ज्ञानेश्वर म्हात्रे, अभिजित वंजारी, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, किशोर दराडे, निरंजन डावखरे, विक्रम काळे आदींनी सहभाग घेतला.

हा केवळ शालेय शिक्षण विभागाचा प्रश्न नाही तर मान्यताप्राप्त सर्व खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसह सर्वच विभागांतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे व्यपगत होणार आहेत.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, आनंददायी शिक्षण मिळण्यासाठी पवित्र पोर्टलच्या माध्यमातून उच्चशिक्षित शिक्षक भरती प्रक्रिया सुरू असून नऊ हजार शिक्षकांची भरती झाली आहे. सध्या १० हजार शिक्षकांच्या भरतीची प्रक्रिया सुरू आहे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी आदी आवश्यक दर्जेदार सुविधा बंधनकारक करण्यात आल्या असल्याची माहिती भुसे यांनी दिली.

मराठी शाळांमधील पटसंख्या कमी होत आहे ही वस्तुस्थिती असून त्याबाबतच्या उपाययोजनांचे नियोजन सुरू आहे.

प्राथमिक शाळांमधील लिपिक, वरिष्ठ लिपिकांची पदे व्यपगत न करण्याबाबतच्या मागणीसंदर्भात बोलताना संबंधित लोकप्रतिनिधींसमवेत बैठक घेऊन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येईल, असेही भुसे यांनी यावेळी सांगितले.

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर, दि.४(जिमाका)– अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविते, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेशित व भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती व इतर ऑनलाईन योजनेसाठी पात्र असलेल्या अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्यासाठी महाडिबीटी प्रणाली दि.३० जून पासुन सुरु झाली आहे. तरी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व शासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कनिष्ठ, वरिष्ठ, व्यावसायिक, बिगर व्यावसायिक, महाविद्यालयातील प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही करावी, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण आर.एम. शिंदे यांनी केले आहे.

## रोटरी क्लब ऑफ औरंगाबादच्या अध्यक्षपदी अनय फणसळकर, सचिवपदी श्री मुकुंद पागे तर कोषाध्यक्षपदी श्री पंकज लोया





छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) – रोटरी क्लब ऑफ औरंगाबादच्या अध्यक्षपदी श्री अनय फणसळकर यांची निवड झाली असून सचिव पदी श्री मुकुंद पागे तर कोषाध्यक्षपदी श्री पंकज लोया यांची निवड झाली आहे. यांचा पदग्रहण सोहळा दिनांक ९ जुलै बुधवार रोजी हॉटेल दी औरस (हॉटेल किज) येथे होणार आहे.

रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद हा शहरातील सर्वात जुना क्लब आहे. क्लबची स्थापना १९५३ साली झाली असून क्लबतर्फे आजपर्यंत वेगवेगळे प्रकल्प घेतले गेले. शाळेतील गरीब विद्यार्थ्यांसाठी गणवेश, वह्या, पुस्तके दरवर्षी देण्यात येतात. मुलांसाठी कॉम्प्युटर, टीव्ही, इ लर्निंग किट्स दिले जातात. सर्वांसाठी नेत्र तपासणी, दंत तपासणी, आरोग्य शिबिरे, रक्त दान शिबिर घेण्यात येतात. गेल्या वर्षी कॅन्सर स्क्रिनिंग टेस्ट करणारी आशा एक्सप्रेस कॅन्सर व्हॅन शहरातील शासकीय कॅन्सर रुग्णालयाला दिली. ज्याद्वारे महिलांची तपासणी करण्यात येते.

## राज्यातील एम.फिल अर्हताधारक प्राध्यापकांचा मार्ग मोकळा; पंचवीस वर्षापासून प्रलंबित प्रश्न निकाली

मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी) – राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांतील एम.फिल अर्हताधारक असलेल्या अनेक प्राध्यापकांचा मागील पंचवीस वर्षापासून प्रलंबित प्रश्न निकाली लागला असून दीर्घकाळ सेवेत असूनही अनेक लाभांपासून वंचित असलेल्या १ हजार ४२१ प्राध्यापकांना न्याय मिळाला आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, १९९३ पूर्वी एम.फिल अर्हता ग्राह्य मानली जात होती. त्यानंतर १४ जून २००६ ते ११ जुलै २००९ या कालावधीत थेट नियुक्त प्राध्यापकांना एम.फिल अर्हता ग्राह्य धरली गेली. मात्र १९९४ ते २००९ दरम्यान एम.फिल प्राप्त करून सेवेत असलेल्या अनेक प्राध्यापकांना या अर्हतेचा लाभ मिळालेला नव्हता. हा प्रश्न तब्बल २५ वर्षांपासून प्रलंबित होता. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान तसेच विद्यापीठ अनुदान आयोग (णऋउ) यांच्या समवेत चर्चा करून राज्यातील या प्राध्यापकांची परिस्थिती, तांत्रिक अडचणी आणि त्यांच्यावर होणारा अन्याय याबाबत वारंवार चर्चा करून काही प्राध्यापकांना आधीच लाभ मिळाल्याचे निदर्शनास आणून, देऊन एकसमानता असावी त्यासाठी एक वेळची सवलत देण्याची मागणी केंद्रीय मंत्री यांच्याकडे केली होती. या मागणीला प्रतिसाद देत विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. २ जुलै २०२५ रोजी राज्यातील १४२१ प्राध्यापकांना एम.फिल अर्हतेच्या दिनांकापासून नेट/सेटमधून सूट देण्यास मान्यता दिली आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे संबंधित प्राध्यापकांना वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीतील पदोन्नती लाभ मिळणार आहेत. दीर्घकाळ सेवेत असूनही अनेक वर्षांपासून लाभांपासून वंचित असलेल्या प्राध्यापकांना न्याय मिळाला आहे.

## दीपिका पदुकोणचे हॉलीवूड वॉक ऑफ फेमवर नाव! हा सन्मान मिळवणाऱ्या पहिल्या भारतीय कलाकार ठरल्या

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – दीपिका पदुकोण ह्या केवळ बॉलिवूडमधील सुपरस्टार नाहीत, तर त्या एक जागतिक स्तरावरील आयकॉन आहेत, ज्यांनी आपल्या अभिनय आणि योगदानाद्वारे देशाच्या पलीकडेही भारताचे नाव उज्वल केले आहे. आता दीपिकाने आणखी एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. हॉलीवूड चेंबर ऑफ कॉमर्सकडून त्यांना प्रतिष्ठित हॉलीवूड वॉक ऑफ फेमवर स्टार प्रदान करण्यात आला आहे – हा मान मिळवणाऱ्या त्या पहिल्या आणि एकमेव भारतीय कलाकार ठरल्या आहेत.



दीपिकाचा हा सन्मान एमिली ब्लंट, टिमोथी चालमेट, रामी मालेक, रॅचेल मॅकॲडम्स, स्टॅनली टुच्ची, डेमी मूर यांसारख्या आंतरराष्ट्रीय नामवंत कलाकारांसोबत यंदाच्या यादीत त्यांचे नाव घेतले जात आहे. जगभरातील प्रसिद्ध कलाकारांमध्ये दीपिकाने केवळ भारतीय चित्रपटसृष्टीतच नव्हे, तर हॉलीवूडमध्येही आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

दीपिकाच्या यशांची यादी दीर्घ आहे. २०१८ मध्ये Time MagazineZo त्यांना जगातील "100 Most Influential Peole' मध्ये स्थान दिले. त्यानंतर त्यांना ढखचए१०० खारिलीं अुरीव मिळाला. २०२२ मध्ये त्यांनी कतारमध्ये झालेल्या FIFA World Cu Final मध्ये ट्रॉफी अनव्हील केली – ही कामगिरी करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय ठरल्या. दीपिका पदुकोण या जगप्रसिद्ध लक्झरी ब्रँड्स Louis Vuitton आणि Cartier च्या ब्रँड ॲम्बेसेडर ठरलेल्या पहिल्या भारतीय आहेत. ह्या माध्यमातून त्यांनी भारताला जागतिक फॅशन आणि लाइफस्टाइल प्लॅटफॉर्मवर स्थान मिळवून दिले आणि इतर भारतीय कलाकारांसाठी आंतरराष्ट्रीय मंच खुले केले. याशिवाय, दीपिका सतत बॉलिवूडमध्येही सक्रिय आहेत. त्यांच्या आगामी चित्रपटांमध्ये अनेक मोठ्या बॅनरचे प्रोजेक्ट्स आहेत. लवकरच त्या प्रसिद्ध दिग्दर्शक ॲटली यांच्या चित्रपटात झळकणार आहेत. त्यांच्या अभिनयाची गती आणि प्रभाव अजूनही कायम आहे.

दीपिका पदुकोण यांचा हॉलीवूड वॉक ऑफ फेमवरील समावेश हा केवळ वैयक्तिक यश नसून, भारतासाठीही एक अभिमानाची बाब आहे. हा सन्मान भारतीय सिनेमा आणि कलाकारांना जागतिक व्यासपीठावर अधिक दृढपणे उभे राहण्यासाठी प्रेरणा देणारा ठरेल.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# कारने मंदीरासमोर ६ जणांना उडवले, २ जणांचा जागीच मृत्यू

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- शहरातील सिडको परिसरात आज सकाळी काळा गणपती मंदिरासमोर एक हृदयद्रावक घटना घडली. भरधाव वेगात असलल्या स्विफ्ट डिझायर कारने सहा पादचाऱ्यांना उडवले. या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेने शहरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मृतांमध्ये मंदिराचे सुरक्षा रक्षक गुणाजी लक्ष्मणराव शेवाळे (वय ६०, रा. विठ्ठल नगर, एन-२) यांचा समावेश आहे. दुसऱ्या मृत व्यक्तीची ओळख अद्याप स्पष्ट झालली नाही. अपघातात जखमी झालल्यांमध्ये विकास समधाने (वय ५०), मनिषा समधाने (वय ४०),



रविंद्र चौबे (वय ६५) आणि श्रीकांत राडेकर (वय ६९) यांचा समावेश आहे. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून काहींना अधिक उपचारासाठी हलवण्यात आले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, प्रशांत एकनाथ मगर (वय ३०, रा. सिडको) हा तरुण टेनिस खेळून गारखेडा क्रीडा संकुलातून परतत असताना त्याच्या ताब्यातील एमएच-२० एचएच०७४६ क्रमांकाच्या स्विफ्ट डिझायर कारचे नियंत्रण सुटले. मंदिरासमोर वळण घेताना भरधाव वेगाने कार थेट पादचाऱ्यांच्या गर्दीत घुसली.

या घटनेचा सीसीटीव्ही फुटेज समोर आला असून त्यात एक महिला मंदिराच्या पायऱ्यांवर चप्पल काढत असतानाच भरधाव कार तिच्यावर आदळताना दिसत आहे. इतर पादचाऱ्यांनाही या कारने जबर धडक दिली. परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. रस्त्यावर रक्ताचे थारोळे पसरले होते, अशी भयावह दृश्ये प्रत्यक्षदर्शींनी सांगितली.

घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. प्रशांत मगर याला ताब्यात घेऊन एमआयडिसी सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताचं नेमकं कारण पोलीस तपासात उघड होईल, असंही अधिकाऱ्यांनी सांगितलं.

या दुर्दैवी घटनेने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत असून सार्वजनिक ठिकाणी सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# बुरशीयुक्त भगर खाल्ल्यास होईल अन्न विषबाधा, सतर्कतेचे आवाहन; विक्रेत्यांची होणार तपासणी

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- उपवासाला फराळ म्हणून खाल्ल्या जाणाऱ्या भगरीला जर बुरशीचा प्रादुर्भाव झाला असेल तर अन्नविषबाधा होऊ शकते. त्यासाठी प्रशासनाने ग्राहकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून बुरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर विक्री करतांना आढळल्यास संबंधित विक्रेत्यांविरुद्ध कारवाई करण्यात येईल असेही निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण फुलारी यांनी कळविले आहे.

भगरीवर मोठ्या प्रमाणात अस्परगिलस प्रजातीच्या बूरशीचा प्रादुर्भाव होतो. ज्यामुळे फ्युमिगाक्लेविन यासारखी विषद्रव्ये तयार होतात. पावसाळ्यातील वातावरण बूरशीच्या वाढीसाठी अनूकुल असते. अशी बूरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर खाण्यात आल्यास अन्न विषबाधा होऊ शकते.

बाजारातून भगर आणल्यानंतर ती निवडून स्वच्छ करा. शक्यतो पाकीटबंद भगर घ्या. ब्रँड नाव नसलेली किंवा लेबल नसलेली भगर पाकिटे व सूटी भगर घेऊ नका. भगर घेतांना पाकीटवरचा पॅकींग दिनांक व अंतिम वापर दिनांक तपासा. भगर साठवताना ती स्वच्छ कोरड्या ठिकाणी, व्यवस्थित झाकणबंद डब्यात ठेवा.जेणकरुन वातावरणातील ओलाव्यामुळे बूरशीची वाढ होणार नाही. जास्त दिवस भगर साठवू नका. तसेच जास्त दिवस साठवलेली भगर खाऊ नका. शक्यतो भगरीचे पीठ विकत आणू नका. भगरीच्या पिठामध्ये वातावरणातील ओलावा शोषून घेण्याची क्षमता अधिक असते. त्यामुळे पिठाला बुरशीची लागण होण्याची शक्यता जास्त असते. भगरीच्या दशम्या किंवा भाकरी खाण्याऐवजी खिचडी खावी. भगरीचे पीठ आवश्यक असेल तेवढेच दळून घ्या. जास्त दिवस पीठ साठवू नका. बाहेरुन दळून आणण्यापेक्षा घरीच दळा.भगर आणि शेंगदाणे हे अधिक प्रथिनेयुक्त पदार्थ आहेत. दोन ते तीन दिवस सलग उपवास असताना या पदार्थाचे सेवन ॲसिडीटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे त्रास होतात. या पदार्थाचे सेवन पचनशक्तीनुसार मर्यादितच करावे.

विक्रेत्यांनी पॅकबंद भगरचीच विक्री करावी तथापि भगर खरेदी करतांना घाऊक विक्रेत्याकडून पावती घ्यावी.भगरीचे पॅकेट, पोत्यावर उत्पादकांचा पत्ता परवाना क्र. पॅकींग दिनांक, अंतिम वापर दिनांक असल्याची खात्री करुन घ्या.मुदबाह्य भगर किंवा भगर पिठाची विक्री करु नये. सुटी भगर व खुले भगर पीठ शक्यतो विक्रीसाठी ठेऊ नये.

भेसळयुक्त भगर विक्री टाळण्यासाठी अन्न औषध प्रशासनाचे वतीने भगरविक्री करणाऱ्या दुकानाची तपासणी करण्यात येणार आहे. भेसळयुक्त, बुरशीयुक्त भगर विक्री करणाऱ्या वा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यावर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम – २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येईल,असा इशारा निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण फुलारी यांनी दिला आहे.

# नमामि गोदावरी कृती आराखडा अंमलबजावणी; जिल्हाप्रशासनातर्फे गोदावरी स्वच्छतेसाठी सामंजस्य करार

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- गोदावरी नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठी 'नमामि गोदावरी'कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने आज सीएसआर बॉक्स या संस्थेशी सामंजस्य करार केला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ह्या करारावर स्वाक्षरी केली.

जिल्ह्यातील ज्या ज्या भागातून गोदावरी नदी वाहते व नदिशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या संबंधित प्रत्येक क्षेत्रात ही संस्था आपले कार्य करेल. यासाठी ही संस्था उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून निधी उभारणार असल्याने वेगळा निधीही द्यावा लागणार नाही,हे विशेष.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने नमामि गोदावरी नदी कृती आराखड्याच्या अंमल बजावणीस मान्यता देण्यासाठी ३० एप्रिल २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार नाशिक ते नांदेड या महाराष्ट्राच्या हद्दीतील गोदावरी नदीच्या स्वच्छतेची प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून ज्या भागातून गोदावरी नदी वाहते त्याभागात या आराखड्याची अंमलबजावणी व इतर उपक्रम करण्यात येणार आहे. त्यासाठी सीएसआर बॉक्स या संस्थेने पुढाकार घेतला असून 'दी गोदावरी इनिशिएटीव्ह' या नावाने हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यासाठी ही संस्था उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून निधी उभारणार असून जिल्हा प्रशासनाने या अभियानाशी संबंधित सर्व विभागांच्या परवानग्या, आवश्यक ते सहकार्य, जनजागृती उपक्रम यासाठी सहयोग द्यावा यासाठी आज हा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

सीएसआर बॉक्स या संस्थेच्या मानसी दिवाण यांनी यावेळी या करारावर जिल्हाधिकाऱ्यांसह स्वाक्षरी केली. संस्थेचे जिल्ह्याचे समन्वयक कल्पेश मोहोड, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन संगिता राठोड यावेळी उपस्थित होते.

गोदावरी नदी ही नाशिक (त्र्यंबकेश्वर) येथे उगम पावून पुढे अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड या जिल्ह्यांमधून वाहत तेलंगणा राज्यात प्रवेश करते. राज्यात या नदीची लांबी ५०४ किमी आहे.




या अभियानांतर्गत नदी काठावर असलेल्या नगरपालिका, ग्रामपंचायती येथे घनकचरा व्यवस्थापन, पाणलोट क्षेत्र विकास, जल संधारण उपचार (जल पुनर्भरण, बांध बंदिस्ती इ.). तसेच गाळ काढणे, जल स्त्रोतांचे बळकटीकरण करणे व यासाठी लोकसहभागासाठी जनजागृती करणे असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शिवाय पाण्यासाठी गोदावरी नदीवर अवलंबून असलेल्या उद्योग, स्थानिक स्वराज संस्था, सिंचन व्यवस्था इ. क्षेत्रात सांडपाणी व्यवस्थापन, पाण्याचा पुनर्वापर इ. विषयी गावनिहाय आराखडा तयार करण्यात येईल. तसेच दुष्काळ प्रवण व पूरप्रवण क्षेत्रांमध्येही जलोपचार राबविण्यात येतील.

या सर्व कामांसाठी जिल्हा प्रशासनाचे संबंधित विभाग हे आपला सहयोग देतील. निधी उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून उभारण्यात येईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# 'रोख नको, ऑनलाइन पाठव' म्हणणाऱ्या लिपिकाला 'फोन पे'वर लाच घेताच अटक

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- तीन वर्षांपूर्वी उपचारादरम्यान निधन झालेल्या होमगार्डच्या रुग्णालयाचे बिल व सानुग्रह अनुदानाची २ लाख ९७ हजार रुपये मंजूर करण्यासाठी २० हजारांची लाच मागणारा होमगार्ड कार्यालयाचा मुख्य लिपिक सोपान पंडित टेपले (४१, रा. मयूर पार्क) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने गुरुवारी दुपारी अटक केली. तक्रारदाराकडून त्याने ऑनलइन फोन पेवर लाच स्वीकारली, हे विशेष.

२४ वर्षीय तरुणीचे ४९ वर्षीय वडील छत्रपती संभाजीनगर विभागात होमगार्ड म्हणून कार्यरत होते. २०२३ मध्ये आजारामुळे रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. नियमाप्रमाणे मुलीने वडिलांच्या उपचारांचे बिल व सानुग्रह अनुदान मिळण्यासाठी एन-१२ येथील जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालयात अर्ज केला होता. मात्र, लाचखोर टेपलेने तिचा अर्ज अडवून ठेवला. उपचारांचे बिल व अन्य रक्कम मंजूर करण्यासाठी २० हजारांची लाच मागितली. वारंवार विनंती करूनही टेपलेने पैशांची मागणी कायम ठेवली. त्यामुळे संतप्त तरुणीने थेट याप्रकरणी एसीबी अधीक्षक माधुरी कांगणे यांच्याकडे तक्रार केली. कांगणे यांच्या आदेशावरून निरीक्षक राजू नांगलोत, संतोष तिगोटे यांनी तक्रारीची खातरजमा केली.


तपासात टेपले लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. पथकाच्या सूचनेवरून तरुणीने पुन्हा टेपलेला संपर्क साधला. टेपलेने तडजोडीअंती १५ हजारांची मागणी केली. मात्र, रोखऐवजी ऑनलाइन पैसे पाठवण्यास सांगितले. गुरुवारी तरुणीने त्याला १५ हजार रुपये 'फोन पे'वर पाठवले. त्यावेळी नांगलोत, तिगोटे यांच्यासह अंमलदार राजेंद्र सिनकर, साईनाथ तोडकर, एन बागूल हे कार्यालयाबाहेरच दबा धरून बसलेले होते. टेपलेने तरुणीला पैसे प्राप्त झाल्याचे सांगताच पथकाने कार्यालयात जात त्याला ताब्यात घेतले. त्याच्यावर सिटी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.


# मनपा हद्द शरनापूर फाटा ते पडेगाव दरम्यान २७२ मालमत्ता पाडली

## दोन दिवस विश्रांती, सोमवारी सिडको बस स्टॅन्ड ते हर्सूल टी पॉईंट पर्यंत कारवाई

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- शहरात सुरू असलेली अतिक्रमण निर्मूलन मोहिमेत आज शरणापूर फाटा ते पडेगाव दरम्यान एकूण २७२ अतिक्रमण, अनधिकृत मालमत्ता निष्कासित करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार आणि नियंत्रण अधिकारी, अतिक्रमण विभाग संतोष वाहुळे यांच्या उपस्थितीत मनपा हद्द शरणापूर फाटा ते पडेगाव दरम्यान केलेल्या कारवाईत एकूण २७२ एवढी पक्की आणि कच्ची बांधकामे ज्यामध्ये हॉटेल, लॉज, दुकाने, शेड,कंपाऊंड,ओटे,गॅरेज,वॉशिंग सेंटर,कमान,जाहिरात फलक, इ. निष्कासित करण्यात आले आहेत.

सदर कारवाई मध्ये महानगरपालिकेच्या ३५० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा तर पोलीस विभागाचे २५० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या कारवाईसाठी २५ जेसीबी, ५ पोकलॅन,१५ टिप्पर, २ रूग्णवाहिका, २ कोंडवाडा वाहने,२




अग्निशमन बंब,५ इलेक्ट्रिक हायड्रॉलीक वाहने इ. वाहनांचा समावेश होता. सदरील कारवाईत मनपा आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ पारस मंडलेचा,कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी, सहायक पोलीस आयुक्त रणजीत पाटील, अतिक्रमण उपायुक्त सविता सोनवणे,सहाय्यक आयुक्त अर्जून गिराम,प्राजक्ता वंजारी,अर्चना राजपूत,रमेश मोरे,संजय सुरडकर, अशोक गिरी, समीउल्लाह,भारत बिरारे,राहूल जाधव,नईम अन्सारी, इमारत निरीक्षक कुणाल भोसले, शिवम घोडके,सागर श्रेष्ठ, तृप्ती जाधव,सय्यद जमशेद, सय्यद मजहर अली, नगररचना विभागाचे सौरभ साळवे, सूरज संवडकर,राहूल,शिवाजी लोखंडे व नागरी मित्र पथकाचे प्रमोद जाधव हे कर्मचारी उपस्थित होते.

शनिवार आणि रविवार या दोन दिवसांची विश्रांती नंतर सोमवारपासून पुन्हा कारवाईची सुरुवात सुरुवात होणार आहे सोमवारी सिडको बस स्टॅन्ड ते हर्सूल टी पॉइंट आणि हर्सूल टी पॉइंट ते दिल्ली गेट या मार्गावर कारवाई होणार आहे या मार्गावर नागरिकांनी स्वतः अतिक्रमण काढून महापालिकेशी सहकार्य करावे असे आवाहन जी श्रीकांत यांनी यावेळी केले.

शरणापुर फाटा ते पडेगाव या मार्गावर अतिक्रमण निर्मूलन मोहीम सुरू असताना आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी आज या मार्गावर स्थळ पाहणी केली. पडेगाव या ठिकाणी त्यांना अवगत करण्यात आले की बाबूलाल महापुरे यांच्या घर सुद्धा अतिक्रमण कारवाईत निष्कासित करण्यात आला आहे. तरी देखील त्यांनी कारवाईला विरोध न करता उलट सहकार्य केलं आणि यापुढे कोणीही विनापरवानगी घर किंवा कोणताही बांधकाम करू नये असे संदेश नागरिकांना दिले. या भावनेचे कौतुक करून जी श्रीकांत यांनी त्यांच्या जागेवर शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार केला.

(पान १ वरुन)

## संजय शिरसाट यांनी निधीवरुन...

संपलेली आहे, इतकी वाईट परिस्थिती कधीच झाली नाही. देशाचा आर्थिक कणा शेतकऱ्यांच्या हातात आहे. तरी शेतकऱ्यांना न्याय दिला जात नाही आहे. इलेक्शन कमिशन सरकारचं दलाल म्हणून काम करतेय, असेही जितेंद्र आव्हाड म्हणाले.

दरम्यान, बिहार निवडणुका तोंडावर आहे आणि मतं कापण्याचे काम सुरु आहे. निवडणूक आयोग थोतांड आहे, त्यांनी कणा हरवला आहे . पुढच्या निवडणुका स्वतंत्र निवडणुका नसतील अशी शंका ही आमदार जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केली आहे.

## ठाकरे ब्रँडवर उपसभापती...

उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी जोरदार टीका केली आहे.

नीलम गोऱ्हे यांनी आज मराठीच्या मुद्यावरून बोलताना ठाकरे ब्रँडवरून सडकून टीका केली. मनसे नेते संदीप देशपांडे यांचाही फुटकळ असा उल्लेख करत जोरदार टीका केली आहे. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की लोकशाहीमध्ये मेळावे घेण्याचा अधिकार सर्वांना आहे. राज्य सरकारने जीआर रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे आणि तसेच समिती नियुक्त करण्यात आली आहे. समिती काय करणार हे विचारात न घेता विरोध करून चुकीच असल्याचे गोऱ्हे यांनी म्हटलं आहे.

मराठी जणांना लक्षात घेऊन मेळा होत आहे असं मी गृहीत धरते असे त्या म्हणाल्या. ब्रँड हा बाजारातील उत्पादनाला वापरतो, काही प्रश्नांची उत्तरं काळ देईल असंही त्या म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या की, विधानसभेमध्ये साठ आमदार निवडून आणून शिंदे साहेबांनी आपली प्रतिमा उंचावली.

# प्रामाणिक मेहनत आणि जिंकण्याच्या इच्छाशक्तीतून ध्येयप्राप्ती शक्य-सरन्यायाधीश भूषण गवई

मुंबइ दि.४ (प्रतिनिधी)- व्यक्तीच्या जडणघडणीत चांगले संस्कार आणि सकस मुल्यांची जोपसना या गोष्टी जास्त महत्त्वाच्या असतात, कोणत्याही यशाचा मार्ग हा खडतर असतो. मात्र प्रामाणिक मेहनत आणि जिंकण्याच्या इच्छाशक्तीतून ध्येयप्राप्ती शक्य असते, असे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

कुलाबा येथील होली नेम हायस्कूल मध्ये आयोजित विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना सरन्यायाधीश भूषण गवई बोलत होते. यावेळी आर्च बिशप जॉन रॉडरिक्स, बिशप डॉमनिक्स फर्नांडिस, व्यवस्थापक फादर कॉनस्टॉन्सीयो नोरोना, प्रिन्सिपॉल सिस्टर लॉरेन्सीया परेरा यांच्यासह संबंधित मान्यवर उपस्थित होते.

सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले की, प्रत्येकाच्या वाटचालीत शालेय जीवनाचा काळ हा सर्वात महत्वाचा असतो. शालेय जीवनातील अनेक आठवणी होली नेम हायस्कुलमधील आहेत, त्याच शाळेत आज विशेष सत्कार होत असल्याचा क्षण निश्चितच खूप आनंदाचा आणि अभिमानाचाही आहे. आईवडिलांसोबतच या शाळेने आपल्यावर धर्मनिरपेक्षता, एकात्मता, बंधुभावाचे संस्कार केले. या शाळेत वेगवेगळ्या समुहाच्या मित्र-परिवारासोबत एका उत्तम वातावरणात शालेय जीवन जगता आले. भारतीय संविधानाचे समतेचे तत्वही शालेय जीवनात या ठिकाणी शिकायला आणि अनुभवायला मिळाले. आपल्या आजपर्यंतच्या वाटचालीत होली नेम शाळेच्या शिकवणुकीचे, येथील शिस्त, संस्काराचे मोठे योगदान असल्याचे सांगून श्री.गवई म्हणाले की, यशाचा मार्ग हा खडतर असला तरी कोणत्याही क्षेत्रात करियर करण्याचे ठरवत असताना विद्यार्थ्यांनी त्यासाठी कष्ट घेण्याची, प्रामाणिक मेहनत करण्याची तयारी ठेवणे आवश्यक आहे. जिंकण्याच्या इच्छाशक्तीमुळेच ध्येय प्राप्त करणे शक्य होत असते. आपल्या वडिलांच्या इच्छेमुळे आपण वकिली क्षेत्रात करियर करण्याचे ठरवले असेही श्री.गवई यांनी यावेळी सांगितले.

आपल्या शाळेचा माजी विद्यार्थी देशाच्या न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च पद असलेल्या सरन्यायाधीश पदी विराजमान होत असल्याचा सार्थ अभिमान आणि आनंद शाळा व्यवस्थापनाला असून प्रत्येक विद्यार्थ्यासाठी आपण एक प्रेरणा असल्याच्या भावना आर्च बिशप जॉन रॉडरिक्स यांनी यावेळी व्यक्त केल्या.

# प्रधानमंत्री सुर्य घर-मोफत वीज योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा-मंत्री संजय शिरसाट

मुंबइ दि.४ (प्रतिनिधी)- प्रत्येक घरात मोफत वीज पोहोचविण्यासाठी प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजना राबविण्यात येत आहे. शासनामार्फत सुरू असलेल्या या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी ऊर्जा विभागाशी समन्वय साधून, सकारात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले.

सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध योजना राबविण्यात येतात. प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजनेच्या अंमल बजावणीसंदर्भात विधानभवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, प्रधान सचिव हर्षदिप कांबळे, आयुक्त सुरेंद्र पवार आदिसह अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. शिरसाट म्हणाले की, सामाजिक न्याय विभागामार्फत सुरू असलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. ऊर्जा विभागाशी समन्वय साधून प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजना राबवावी. तसेच, पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत असल्याची खात्री करण्यासाठी आयुक्तालयामार्फत यंत्रणा राबवावी. प्रत्येक लाभार्थ्याच्या घरावर सौर पॅनल उभारल्यास त्यांना ३०० मेगावॅट वीज मोफत मिळणार असून, वीजेची बचतही होणार आहे. याचा लाभ त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**कार्यकारी अभियंता**
यांचे कार्यालय
**जागतिक बँक प्रकल्प विभाग,**
'बांधकाम भवन' स्नेह नगर, अदालत रोड,
छत्रपती संभाजीनगर-४३१००५
ई-मेल : worldbankaurangabad.ee@mahapwd.gov.in
दुरध्वनी ०२४०-२३१३४२




**ई-निविदा सुचना क्रं. ०१ (दुसरी वेळ) सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन सक्षम वर्गातील कंत्राटदार यांच्याकडुन **ब-२** नमुन्यातील एका कामाकरीता निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. (एकूण कामे **०१**)

१) https://mahapwd.gov.in
२) https://mahatenders.gov.in

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)

**- स्वाक्षरीत -**
**कार्यकारी अभियंता**
**जागतिक बँक प्रकल्प विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**